नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.२**
**एप्रिल २०२१**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा मंगळवार,दि.२०/४/२०२१ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता **मा.महापौर,मा.पदाधिकारी व मा.पक्षनेते यांची पुणे महानगरपालिका भवन येथील कार्यालये तसेच प्रभागनिहाय क्षेत्रीय कार्यालयांतील प्रभाग समिती कार्यालये येथून** दृक श्राव्य ( व्हिडीओ कॉन्फरन्सींग ) द्वारे भरेल.तसेच या कालावधीत मे.महाराष्ट्र शासन यांचे मा.मुख्यसभेस प्रत्यक्ष उपस्थितीबाबत आदेश आल्यास सदरची मासिक सभा हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**
**महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.**

**स्थायी समितीचे ठराव**

**<u>विषय क्र.२</u>**

संदर्भ :- १) मा.राजेंद्र शिळीमकर व मा.बाळासाहेब ओसवाल यांचे दि.१६/२/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२३३, दिनांक १६/२/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

बिबवेवाडी येथील स.नं.६५१ ते ६५७,६२१,६२३,६२७,५५६,६२६,६२० सदरच्या ठिकाणी अनेक असे पत्र्याचे शेड उभे आहेत. सदरच्या शेडला खाते मार्फत २६७ प्रमाणे कर लावला जातो. परंतु सदरचे ठिकाणी कोणतेही पक्के स्वरूपाचे वीट बांधकाम केलेले नाही. त्यामुळे या सर्व शेडला एक पटीमध्ये कर आकारणी करण्यास जेणे करून आपल्या पुणे महानगरपालिकेच्या महसुलामध्ये वाढ होण्यास मदत होईल. त्यामुळे सदरच्या ठरावानुसार या ठरावाची कारवाई अतित्वर्य करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३२९, दि.१७/३/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.३</u>**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/घन.व्यव./८९५ दि.९/३/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३७,दि.९/३/२०२१

----

मा.अति.महा.आयुक्त(इ) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे व वाहतुक करणे या कामासाठी खात्या अंतर्गत शिल्लक तरतुदीमधून र.रु. ११ कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक, घनकचरा व्यवस्थापन, शहरातील कचऱ्यापासून वीजनिर्मिती करणेसाठीचे प्रकल्प उभारणीसाठी होणारा अतिरिक्त खर्च CE19A189 | ११ कोटी | ---- |

नविन सुचवलेले काम –

घनकचरा व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन करणेसाठी प्राथमिक वाहतुकीसाठी गाडया आऊटसोर्सिंग तत्वावर मनपा ठेकेदाराकडील चालविणे RE19A149 ---- ११ कोटी

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४५६, दि.१८/३/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.४**

संदर्भ :- १) पुणे कॅन्टोन्मेंट विभाग यांचे पत्र दि.२३/११/२०२०
२) पुणे कॅन्टोन्मेंट विभाग यांचे दि.१८/१/२०२१ रोजीचा मेल
३) पुणे कॅन्टोन्मेंट विभाग यांचे दि.१९/१/२०२१ रोजीचा मेल
४) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/घकव्यका/७५७ दि. १६/२/२०२१ चे पत्र
५) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२३५, दिनांक १६/२/२०२१

------

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे कॅन्टोन्मेंट मधील कचरा प्रकल्पामध्ये पुणे महापालिकेचा कचरा, प्रक्रिया करणेसाठीदेणेबाबत व प्रक्रिया प्रकल्प उभारण्यास शास्त्रोक्त भू भराव करण्यास पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे निधी वर्ग करणेसाठी पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांच्या भागात वापरला जाणार असल्याने व ती जागा पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांच्या मालकीची असल्याने सदर निधी बोर्डाकडे वर्ग करणेस व पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांची जागा वापर करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार खालील बाबीस मान्यताद्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डातर्फे प्रकल्प क्षमता १०० मे टन वाढवणे करिता येणारा अंदाजे खर्च र रु. ७.३९ कोटी ( RO प्लांट च्या खर्चासह ), शास्त्रीय भू भराव तयार कारणेसाठी पुणे मनपाच्या अस्तित्वातील उरुळी देवाची येथील भू भराव तयार करणे करिता आलेला मूळ खर्च अंदाजित र. रु. १०.७९ कोटी व शास्त्रीय भू भराव तयार करणे करिता संपूर्ण खर्च करणे व शास्त्रीय भू भराव तयार झालेनंतर त्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी प्रतिवर्षी येणारा अंदाजित खर्च र. रु. ८.२१ कोटी इतका खर्च त्याच्या वापराच्या प्रमाणात म्हणजेच ७० ( पुणे मनपा ) ; ३० (पुणे कॅन्टोन्मेंट) या नुसार करणे इतका निधी पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे वर्ग करणेस.

२) पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डातर्फे पुणे मनपाचा दैनंदिन १०० मे टन कचरा प्रोसेस करणेकरिता पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डास टिपिंग फी र रु ४०२/- प्रती मे टन प्रती दिवस अधिक १० % प्रशासकीय शुल्क व टिपिंग फी १०% पप्रतिवर्षी दरवाढ करणे तसेच १०० मे टन कचरा प्रोसेस करणे करिता विद्युत बिलाचा खर्च प्रक्रियेचा प्रमाणात विभाजित करणे , रिजेक्ट ची विल्हेवाट पुणे मनपाने लावणेस,

३) ८ एकर क्षेत्र गृहीत धरून येणारा खर्च या नुसार पुणे कॅन्टोन्मेंट जागेमध्ये शास्त्रीय भूभराव करणे व त्याची ७० ( पुणे मनपा ) ; ३० (पुणे कॅन्टोन्मेंट) या प्रमाणात विभागणी करून रिजेक्ट जमा करणेसाठी वापरणेस,

४) पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांच्या जागेतील परिस्थिती व वस्तुस्तिथी विचारात घेऊन व पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचे मार्फत तयार करण्यात येणारे पु ग प हे पुणे मनपा व पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांच्या नव्याने स्थापन संयुक्त समिती मार्फत तपासणी केलेनंतर पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचे मार्फत निविदा मागविण्यात येणार असून मागविण्यात आलेल्या निविदा व पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड त्यांच्या प्रस्तावानुसार तयार करण्यात येणाऱ्या शास्त्रीय भूभरावाकरिता येणारा अंदाजित खर्च व शास्त्रीय भूभराव तयार झालेनंतर प्रतिवर्षी शास्त्रीय भूभरावाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च त्याच्या वापराच्या प्रमाणात म्हणजेच ७० ( पुणे मनपा ) ; ३० (पुणे कॅन्टोन्मेंट) या नुसार विभाजित करणेस,

५) उपरोक्त बाबीच्या मान्यतेच्या अनुषंगाने पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचे समवेत १०० टन प्रकल्प क्षमता वाढविले नंतर प्रकल्पाची १५ वर्ष मुदतीकरिता करारनामा करणेस,

६) पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डातर्फे निविदा मागविण्यात आले नंतर निविदा प्राप्त झालेनुसार निविदा जास्त / कमी या प्रमाणात अनु क्र १ नुसार रक्कम पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डास वर्ग करणेस,

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३३०, दि.१७/३/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.५**

संदर्भ :- १) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२५४ दि. २६/१०/२००६
२) मा.मुख्य सभा ठराव क्र. १६२ दि.२८/९/२००७
३) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/घनकचरा/७६६ दि. १६/२/२०२१ चे पत्र
४) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२३६, दिनांक १६/२/२०२१

------

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी"स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित "या अशासकिय संस्थेबरोबर एक महिन्यांसाठी तात्पुरती करारवाढ करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी व शहरातील साफसफाई व स्वच्छता राखण्याच्या दृष्टीने "स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित" या अशासकिय संस्थेबरोबर दि.१३/०२/२०२१ पासून पुढीलएक महिन्यासाठी तात्पुरती करारवाढ करणेस,

२) स्वच्छ सहकारी संस्थेला देखरेख व व्यवस्थापन,प्रशिक्षण व नागरिकांमधील जनजागृतीचा खर्च,आवश्यक सेवकवर्गाचे मानधन,महानगरपालिकेशी समन्वय साधणे,क्षेत्रिय कार्यालयांशी समन्वय साधणे,प्रभागनिहाय आरोग्य कोठीवरील सेवकांशी समन्वय साधणे,जनजागृती मोहीम व प्रशिक्षण इ. बाबींसाठी एक महिन्यांच्या कालावधीसाठी र.रु.३२,६१,६०८=५ बजेट तरतुदीप्रमाणे रक्कम अदा करणेस. हा खर्च RE19A164 या अर्थशिर्षकावर नवीन आर्थिक वर्षांमध्ये खर्च करणेस,

३) दि.१३/०२/२०२१ पासून पुढील १ महिना कालावधीत ढकलगाडी दुरुस्ती करीता प्रति महिना प्रति कचरा वेचक र.रु.५०/- याप्रमाणे १ महिन्याकरीता र.रु.५०/- आदा करणेस. हा खर्च RE19A125 या अर्थशिर्षकावर नवीन आर्थिक वर्षांमध्ये २०२१-२०२२ खर्च करणेस,

४) कचरा वेचकांसाठी आवश्यकतेनुसार सुरक्षा प्रावरणे,ढकलगाड्या व बकेट देणेस. हा खर्च RE19A116 या अर्थशिर्षकावर नवीन आर्थिक वर्षांमध्ये खर्च करणेस,

५) अ)वर्गीकृत कचरा गोळा करण्यासाठी प्रत्येक घरापाठीमागे रु. ७०/- दर महा इतके शुल्क प्रस्तावित सहकारी संस्थेमार्फत नागरिकांकडून आकारण्यास,

ब)झोपडपट्टीमध्ये प्रति झोपडी र.रु.५०/- प्रति महिना आणि प्रत्येक कचरावेचकास प्रति झोपडी प्रति महिना र.रु.१०/- प्रोत्साहन भत्ता म्हणून देणेस,

क)व्यावसायिकांकडून निर्माण होणा-या कच-याचे संकलन करणेसाठी दरमहा र.रु.१४०/- इतके शुल्क आकारणेस.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३३१, दि.१७/३/२०२१ चा झाला आहे.)**

**<u>मा.विधी समितीचे ठराव</u>**

**विषय क्र.६**

संदर्भ :- १) मा. श्री. सुनिल कांबळे,आमदार व मा. सौ. मंगला मंत्री यांचे दि. १४/०१/२०२१ चे पत्र.
२) मा.विधी समिती ठराव क्र.४०,दि.८/३/२०२१

-----

मा.विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून–

१) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.पीएमसी ३०१४/प्रक्र ०२/नवी/२२, दिनांक २६/८/२०१४ अन्वये उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदासाठी खालील प्रमाणे सेवा नियम मंजूर करण्यात आले होते.

| अ.क्र. | संवर्ग | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १. | लेखा सेवा श्रेणी १ | नामनिर्देशन | अ. सनदी लेखापाल (CA) किंवा ICWA किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची Mcom (Audit & Accounts) प्रथम श्रेणी<br>ब. MBA (FINANCE) पदव्युत्तर पदवी प्रथम श्रेणी<br>अनुभवः सरकारी /निम सरकारी/खासगी संस्थेतील कामाचा किमान ५ वर्षे अनुभव |
| | | पदोन्नती | अ. वित्तीय व्यवस्थापणातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ब. महानगरपालिका विभागीय परीक्षा (लेखा)उत्तीर्ण असलेल्या लेखा अधिकारी या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांमधून सेवा जेष्ठतेने |

२) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.पीएमसी ३०१९/प्रक्र १०८/नवी/२२, दिनांक ३/८/२०२० व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.पीएमसी २०२०/प्रक्र २१५/नवी/२२, दिनांक ३०/९/२०२० अन्वये उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदासाठी खालील प्रमाणे सेवा नियम सुधारित करण्यात आले होते.

| **अ.क्र.** | **संवर्ग** | **नेमणुकीची पध्दत व टक्केवारी** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव** |
|---|---|---|---|
| १. | लेखा सेवा श्रेणी १ | नामनिर्देशन २५% | अ. सनदी लेखापाल (CA) किंवा ICWA किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची चलो (Audit & Accounts) प्रथम श्रेणी<br>अनुभवः सरकारी /निम सरकारी/खासगी संस्थेतील कामाचा किमान ५ वर्षे अनुभव |
| | | पदोन्नती ७५% | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाच्या सरळ सेवेकरिता निश्चित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या पुणे मनपा सेवेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्या मधून (सीए ला प्राधान्य/ ICWA) निवड प्रक्रियेने पद भरण्यात यावे. |

उपरोक्त अ.क्र.२ अन्वये विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव रद्द करण्यात येऊन अ.क्र.१ मध्ये नमूद केल्या प्रमाणे उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदासाठी निश्चित केलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव कायम ठेवनेत येऊन कार्यालय परिपत्रक क्र. अतिमआ (ज)/साप्रवि/आस्था/६२९२, दिनांक १४/१२/२०२० अन्वये सुरु केलेली निवड प्रक्रिया थांबविणेस मान्यता देण्यात येत आहे व याप्रमाणे कार्यवाही करणेकामी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे

**विषय क्र.७**

संदर्भ :- १) मा.अजित दरेकर व मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि.१५/१/२०२१ चे पत्र.
२) मा.विधी समिती ठराव क्र.४१,दि.८/३/२०२१

----

मा.विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून-

नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.पीएमसी-३०१४/प्र.क्र.२/नवि-२२,दि.२६/८/२०१४ अन्वये विहित केलेल्या खालील तक्त्या नमूद केलेल्या हुद्यांच्या सेवानियमामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर बदल करण्यास प्रस्ताव मे.राज्य शासनाकडे पाठविणेस मंजूरी देणेबाबत.मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **प्रचलित तरतूद** | **प्रस्तावित तरतूद** |
|---|---|---|---|
| १. | उप कामगार अधिकारी | नामनिर्देशित-१००%<br>**अर्हता-**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेखा पदवीधर किंवा समकक्ष अर्हता आणि डिप्लोमा इन लेबर लॉ किंवा विधी शाखेच्या पदवीधरास प्राधान्य | नामनिर्देशित-५०%<br>**अर्हता-**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेचा पदवीधर किंवा समकक्ष अर्हता आणि डिप्लोमा इन लेबर लॉ किंवा विधी शाखेच्या पदवीधरास प्राधान्य,कामगार कल्याण व कामगार कायदे विषयक कार्यालयीन कामकाजाचा ४ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | पदोन्नती-५०%<br>**अर्हता-**<br>नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कामगार कल्याण व कामगार कायदे विषयक कार्यालयीन कामकाजाचा ४ वर्षाचा अनुभव असणारे सर्व संवर्गातील वर्ग ३ मधील कर्मचारीमधून |

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र.८**

संदर्भ- १) मा.ॲड् अविनाश राज साळवे, मा.उमेश ज्ञानेश्वर गायकवाड, मा.गणेश ढोरे,मा.सौ.शितल अजय सावंत मा. अजय खेडेकर, मा.सौ.अश्विनी किशोर पोकळे, मा.सौ.हेमलता निलेश मगर, मा. सौ.चाँदबी हाजी नदाफ , सौ.कालिंदा मुरलीधर पुंडे यांचे दि. १२/२/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४५,दि.१२/२/२०२१

----

मा. शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहरामधील ब-याच ठिकाणी अनाधिकृत जाहिरात होर्डिंग्ज उभारण्याचे व पुणे शहर विद्रुपीकरण करण्याचे काम राजरोसपणे चालू आहे. सदरचे अनाधिकृत जाहिरात होर्डिंग्ज उभारणारे कायदेशीर यंत्रणेचा दुरूपयोग करून महानगरपालिकेची व मे.न्यायालयाची दिशाभूल करीत असतात. बेकायदेशीर होर्डिंग्जवर जाहिरात देणा-या जाहिरातदारामुळे सदर बेकायदेशीर होर्डिंग्ज उभारणा-या व्यक्ती व जाहिरात संस्थांना प्रोत्साहन मिळत आहे. तसेच त्यामुळे पुणे महानगरपालिकेचा जाहिरात होर्डिंग्जच्या महसूलीमध्ये आर्थिक तूट निर्माण होऊन पुणे मनपाच्या उत्पन्नामध्ये प्रचंड नुकसान होत आहे.

तरी पुणे महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसान रोखण्याकरिता सदरच्या बेकायदेशीर होर्डिंग्ज उभारणारे जाहिरातदार, जाहिरात संस्था व जागा मालक यांना कायदेशीर जरब बसण्यासाठी तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४४१, दि.१८/३/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.९**

**संदर्भ-१)**मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ टिडीआर/७७५,दि. २२/२/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१६३,दि.१२/३/२०२१

---

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे खराडी स.नं.५६/२ब /२(पै) | १८ मी. डी.पी. रोड, ३० मी. डी.पी. रोड, ऑक्ट्रॉय नाका-४ व एसटी-४ | ब्रम्हाकॉर्प लि.तर्फे अधिकृत डायरेक्टर अजय रामकुमार अगरवाल | विरळ वस्ती | १८४९३.००चौ.मी. | १८ मी. डी.पी. रोड- २९३६.५७ चौ.मी.<br>३० मी. डी.पी. रोड- ९६२.२३ चौ.मी.<br>ऑक्ट्रॉय नाका ४- १८९७.३६ चौ.मी. व एसटी -४ - १२६९६.३४ चौ.मी.<br>असे एकूण क्षेत्र- १८४९२.५० चौ.मी. पैकी १५०५५.८७ चौ.मी. X २.१५ = ३२३७०.१२ चौ.मी पैकी<br>१)१६०००.०० चौ.मी.<br>२)१६३७०.१२ चौ.मी. | ००५७७४<br>००५८०२ | फेब्रुवारी २०२१ |

**विषय क्र.१०**

**संदर्भ-१)** मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ टिडीआर/७७३,दि. २२/२/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१६४,दि.१२/३/२०२१

---

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जानेवारी २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे महर्षी कर्वेनगर स.नं.११/२ (पैकी) हिंगणे बु., सि.स.नं. ५४३ (पैकी) | २० मी. डी.पी. रस्ता व प्रायमरी स्कूल (पी.एस-३४) | बी.के. पाटे एन्टरप्रायजेस् तर्फे भागीदार श्री योगेश बाळकृष्ण पाटे | विरळ वस्ती | ५५५.८४ चौ.मी. | ५५५.८४ चौ.मी. X २.१० = ११६७.२६ चौ.मी ६१७.०६ चौ.मी | ००५८१७ | जानेवारी २०२१ |
| | | २० मी. डी.पी. रस्ता व प्रायमरी स्कूल (पी.एस-३४) | | | | ५५५.८४ चौ.मी. X २.१० = ११६७.२६ चौ.मी ५५०.२० चौ.मी | ००५८१८ | जानेवारी २०२१ |

**विषय क्र.११**

**संदर्भ-**१) मा. ॲड्. अविनाश साळवे, मा.सौ.शितल अजय सावंत, मा.सौ.कालिंदा मुरलीधर पुंडे, मा.चाँदबी हाजी नदाफ,मा.अजय पाडुरंग खेडेकर, मा.सौ.हेमलता निलेश मगर, मा.सौ.अल्पना गणेश वरपे, मा.धनराज बाबुराव घोगरे, मा.गणेश बाळासाहेब ढोरे, यांचे दि. १२/३/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१६५,दि.१२/३/२०२१

----

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून...

पुणे शहरातील पुणे मेट्रोचे कार्य प्रगतीपथावर आहे. तसेच सदर पुणे मेट्रो मार्गिका सन २०२१-२२ पर्यंत कार्यरत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुणे शहरातील वाहतूक सुरळीत होणार आहे. सदर पुणे मेट्रो मार्गिका व मेट्रो स्थानक परिसरात सद्यस्थितीत अतिक्रमण असल्यामुळे पुणे मेट्रो कार्यरत होताना अतिक्रमणाच्या अडथळयामुळे पुणे शहरातील वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुणे मेट्रोचा उद्देश सफल पुर्ण होण्याकरिता अडचणी निर्माण होवू शकतात.

तरी पुणे मेट्रो मार्गिका व स्थानकाच्या रस्त्यावरील चौकातील अतिक्रमणाची त्वरीत पाहणी करावी व सदर मार्गातील अतिक्रमणे काढण्यात यावी. जेणेकरून पुणे मेट्रोच्या संचलनात सुलभता येईल व पुणेकरांना गतीमान मेट्रोने प्रवास सुखकर होईल त्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१२**

**संदर्भ-**१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ टिडीआर/९२७,दि. १५/३/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१७६,दि.२६/३/२०२१

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी होल्डरचे नाव | टिडी आर झोन | क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे, कोंढवा खुर्द स.नं.४अ/१अ/ १ हि.नं.१०+११ (जुना) स.नं.४अ /१ब/१ (नवीन) स.नं.४अ/१अ/ १ हि.नं.१२ अ स.नं.४अ/१अ/ १हि.नं.१२ ब सि. स.नं.३९३ पैकी | झोपडपट्टी पुर्नवसन योजना | मे. ऑक्सफर्ड प्रॉपर्टीज (कोंढवा प्रोजेक्ट) | सुधारित नियामावली दि.१५(१)-५ नुसार झोन नाहीत | ६५६१.५९ चौ.मी (इमारत ए चे अंतिम भोगवटा प्रमाणपत्र आदा केलेपोटी देय ३०% टिडीआर) | ००४६०९ | फेब्रुवारी २०२१ |

**विषय क्र.१३**

**संदर्भ**-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ टिडीआर/८७८,दि. ८/३/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१७७,दि.२६/३/२०२१

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | न.भू.क्र.१४९० (जुना सि.स.न. ९२८) फाप्लॉ.क्र. ९२८ अ, कसबा पेठ, कागदीपुरा, पुणे | झोपडपट्टी पुर्नवसन योजना | मे. केदार असोसिएटस | सुधारित नियामावली नियम क्र.१५(१)-५ नुसार झोन नाहीत | १४०५.६१ चौ.मी | ००४६१० | फेब्रुवारी २०२१ |

**विषय क्र.१४**

**संदर्भ**-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ टिडीआर/९९७,दि. १७/३/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१७८,दि.२६/३/२०२१

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **अ .क्र .** | **आरक्षणाचा सर्व्हे नंबर** | **आरक्षणाचा प्रकार** | **डी.आर.सी. होल्डरचे नाव** | **टिडी आर झोन** | **७/१२ उता-या नुसार क्षेत्र** | **क्षेत्र चौ.मी** | **डीआर सी क्र.** | **डीआरसी दिल्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे, वारजे स.नं. ७८/१ब/११ ( पैकी) | प्लेग्राउंड (पीजी-१६) | गोयल गंगा डेव्हलपर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड कंपनी तर्फे संचालक जयप्रकाश सिताराम गोयल | विरळ वस्ती | ५००.०० चौ.मी | ५००.०० चौ.मी x २.२०= ११००.०० चौ.मी. | ००५८१९ | फेब्रुवारी २०२१ |

**विषय क्र.१५**

**संदर्भ**–१) मा. श्रीनाथ भिमाले यांचेदि.२६/०३/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१८४,दि.२६/३/२०२१

-----

मा. शहर सुधारणा समिती मध्ये झालेल्या चर्चेस अनुसरून–

पुणे महानगरपालिकेच्या सन १९८७ च्या डी.पी. प्रस्तावामध्ये शहरामध्ये एच.सी.एम.टी.आर. प्रस्ताव तयार करण्यात आला होता. सदर प्रस्तावामध्ये बाधित असलेल्या इमारतींचा विचार करून काही ठिकाणी एच.सी.एम.टी.आर. मार्ग बदलण्यात आलेला आहे. नविन सुधारित आखणीनुसार स्वारगेट येथील पर्वती सर्व्हे नं.३३अ/२, सिटी स.नं.६६१५, फायनल प्लॉट नं.४९० (पैकी) ही मिळकत एच.सी.एम.टी. आर च्या मार्गामुळे पुर्णपणे बाधित होत असल्यामुळे सदरचा रस्ता उत्तर दिशेकडे सरकवून सातारा रस्त्यास समांतर असा सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे बदलण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

## <u>नांव समितीची निवेदने</u>

<u>विषय क्र.१६</u>

पुणे मनपा हद्दीतील उद्याने, रस्ते, पूल, चौक इत्यादी सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावांची शिफारस करण्याबाबत **दिनांक १९/३/२०२१ रोजी सकाळी ११:२५** (अकरा पंचवीस ) व दि. **१९/३/२०२१** ची सकाळी ११.३० ( साडे अकरा ) वाजताची नांव समितीची दोन निवेदने विचारासाठी,

## मा.सभासदांचा प्रस्ताव

**विषय क्र.१७**

माहे एप्रिल २०२१ पासून पुढील ३ महिने अखेर रजा मिळणेबाबत मा.सौ.मुक्ता टिळक,आमदार तथा सभासद पुणे महानगरपालिका यांचे दि.१८/३/२०२१ चे पत्र.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ६/४/२०२१

**शिवाजी दौंडकर**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सूचना –** कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.